**वाचा**:-१.कार्यालयीन आदेश जाक्र/कलामंदीर/७२/२००२, दि.३०/१०/२००१

२.कार्यालयीन आदेश जाक्र/कलामंदीर/४३/२००२, दि.१४/०३/२००२

३.कार्यालयीन आदेश जाक्र/कलामंदीर/५२/२००२, दि.०४/०४/२००२

४.मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८४, दि.२१/०९/२०१८

५.कार्यालयीन आदेश जाक्र.मिपवि/कक्ष-१/२९७९/२०१८ दि.०९/१०/२०१८

नाशिक महानगरपालिका,नाशिक

जाक्र.मिपवि/कक्ष-१/३०९९/२०१८

दिनांक :- २०/ १० /२०१८

## महाकवी कालीदास कलामंदीर व महात्मा फुले कलादालन- सुधारीत नियमावली

१) महाकवी कालीदास कलामंदीरातील ९४२ आसनांपैकी मुख्य प्रेक्षागृहामध्ये ६८२, बाल्कनीमध्ये २४० आणि बालकक्षामध्ये २० आसने आहेत. मुख्य प्रेक्षागृहातील रांग क्र.१ मधील आसन क्र. ६ व ७ रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ सदस्यांसाठी आणि आसन क्र. ८ ते १३ महानगरपालिकेसाठी कायमस्वरुपी राखीव ठेवण्यात येतील. कोणत्याही परिस्थितीत सदर राखीव आसनांची तिकीट विक्री करता येणार नाही. उर्वरित ९३४ आसने तिकीटांकरीता उपलब्ध राहतील.

२) नाशिक मनपा आदेश जाक्र.मिपवि/कक्ष-१/२९७९/२०१८ दि.०९/१०/२०१८ अन्वये लागू केलेल्या दराने महाकवी कालीदास कलामंदीर व महात्मा फुले कलादालन कार्यक्रमांकरीता उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि राजकिय पक्षांचा मेळावा अथवा लावणी अशा स्वरुपाच्या कार्यक्रमांसाठी कलामंदीर/कलादालन दिले जाणार नाही.

३) कालिदास कलामंदिरातील नाटकाची रंगीत तालीम,बालनाटय,हौशी नाटक व व्यावसायिक नाटक या वर्गवारीसाठी शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवसांसाठी कोणतेही अतिरिक्त् दर लागू होणार नाहीत.

४) कलामंदीराकरीता लागू करण्यात आलेल्या भाडयामध्ये रंगमंचावरील साहीत्य, माईक व्यवस्था, जनरल लाईट मोफत दिले जाईल. तथापि, तद्अनुषंगीक अन्य जादा बाबींचे दर पुढीलप्रमाणे लागू होतील-

I) जादा लाईट ५०० वॅटसाठी- रु. १००/- प्रत्येकी
इलेक्ट्रिक ॲटॅचमेंट- रु.५०/- प्रति प्लग

II) व्हिडीओ शुटींग- रु.५००/- प्रति कॅमेरा प्रतिसत्र

III) रेकॉर्डींग- रु.५००/-

IV) प्रेक्षागृहातील ६ फूट X ४ फूट आकारमानाचे जाहीरात फलक- जागा लायसेन्स फी- रु.६०/- प्रति दिन
जाहीरात कर- रु.५०/-

V) प्रेक्षागृहाबाहेरील व्यावसायिक जाहीरातीकरीता स्वतंत्र कर आकारण्यात येईल.

VI) व्हि.आय.पी.कक्ष- रु.५००/-

VII) व्हि.व्हि.आय.पी.कक्ष- रु. १,०००/-

VIII) शो टॅक्स - रु.५०/-

५) प्रयोग सुरु होण्याच्या अर्धा तास अगोदर कलामंदीरातील प्रेक्षागृह उपलब्ध होईल. ठरवून दिलेल्या वेळेत प्रयोग संपविण्याची जबाबदारी अर्जदारांची राहील. वेळ संपल्यानंतर ३० मिनिटास रु.१०००/- याप्रमाणे जादा आकार भरावा लागेल.

६) कलामंदीरातील कार्यक्रमांसाठी सत्र कालावधी खालीलप्रमाणे राहील-

अ) सकाळचे सत्र - सकाळी ७.३० ते ११.३०
ब) प्रथम सत्र - सकाळी १२.०० ते १६.००
क) दुसरे सत्र - दुपारी १६.३० ते २०.३०
ड) तिसरे सत्र - रात्री २१.०० ते १.००

७) कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त तीन महिने अगोदर ऑनलाईन आरक्षण करता येईल. तथापि एका संस्थेस एका वेळी जास्तीत जास्त १० सत्रांचे आरक्षण करता येईल.

८) कार्यक्रमाच्या आरक्षणाकरिता अनामत रक्कम व कार्यक्रमाच्या सत्राचे संपूर्ण भाडे एकत्रितपणे जमा केल्यानंतरच, कार्यक्रमाचे आरक्षण देणेत येईल. त्याशिवाय कार्यक्रमाचे आरक्षण देणेत येणार नाही.

९) आयोजकांनी कार्यक्रमासाठी केलेले आरक्षण रद्द करावयाचे झाल्यास कार्यक्रमासाठी भरण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. त्याचप्रमाणे कार्यक्रमाच्या भाडे रक्कमेचा परतावा खालीलप्रमाणे देणेत येईल-

| अ.नं. | आरक्षण रद्द करण्याचा कालावधी | **परताव्याची रक्कम** | |
|---|---|---|---|
| | | **भाडे** | **अनामत** |
| १. | **कार्यक्रमापूर्वी १५ दिवस अथवा कमी** | **निरंक** | **निरंक** |
| २. | **कार्यक्रमापूर्वी १६ ते २१ दिवसांपर्यत** | **५० %** | **निरंक** |
| ३. | **कार्यक्रमापूर्वी २२ ते ३० दिवसांपर्यत** | **७५ %** | **निरंक** |
| ४. | **कार्यक्रमापूर्वी ३१ दिवस अथवा अधिक** | **१०० %** | **निरंक** |

१०) मनपाने परवानगी दिलेल्या व्यक्तीने/संस्थेने परस्पर अन्य व्यक्तीस कार्यक्रमाचे आरक्षण देता येणार नाही. तसे आढळल्यास रु. २५,०००/- दंड आकारणेत येईल.

११) प्रयोगापूर्वी चार दिवस आधी सकाळी ९.०० ते १२.०० व दुपारी ५.०० ते ८.०० आणि प्रयोगाच्या दिवशी पूर्ण दिवस तिकीट विक्री करता येईल. तिकीट विक्रीचे काम नियमानुसार सुरु आहे किंवा कसे हे पाहण्याच्या अधिकार महापालिका प्रशासनास राहील. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना अर्जदारावर बंधनकारक राहतील.

१२) पहिल्या ४ रांगेतील आसनाचा तिकीट दर रु.५००/- किंवा अधिक असल्यास अथवा अन्य कोणत्याही रांगेतील आसनाचा तिकीट दर रु.३००/- किंवा अधिक असल्यास, कार्यालयीन आदेश क्र.२९७९, दि.०९/१०/२०१८ मध्ये नमूद वर्गवारीतील अधिकतम दर लावण्यात येतील. तसेच कोणत्याही रांगेतील आसनांचे तिकीटाचे दर तपासण्याचे अधिकार मनपा प्रशासनास राहतील.

१३) तिकीट विक्रीपूर्वी रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ व मनपाकरिता राखीव आसनांची तिकीटे व्यवस्थापनाकडे जमा करावी लागतील.

१४) प्रयोगाच्या जाहीरातींमध्ये व तिकीटावर प्रयोग सादर करण्याऱ्या संस्थेचे नाव तिकीट दर टाकणे सक्तीचे आहे.

१५) प्रयोगासंदर्भात सर्व कामगार कायदे व शासकीय नियमांचे पालन करणेची जबाबदारी आयोजकांवर राहील. कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी कार्यालयात पोलीस विभागाकडील यांचेकडील परफॉरमन्स व ध्वनिक्षेपक परवाना, रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ प्रमाणपत्र, इतर आवश्यक शासकीय प्रमाणपत्रे इत्यादी परवाने दाखविणे सक्तीचे आहे.

१६) सुरक्षेची व्यवस्था आयोजकाने करणे आवश्यक आहे. तथापि तातडीच्या प्रसंगी प्रशासनास पोलीस मदत मागविण्याची गरज पडल्यास, त्याचा संपूर्ण खर्च आयोजकास दयावा लागेल.

१७) आयोजकास प्रयोगाचे कालावधीत रंगमंच व रंगपट वापरता येईल. तथापि, प्रयोगाच्या वेळी संबंधित व्यक्तीशिवाय अन्य व्यक्तिंना प्रवेश दिला जाणार नाही.

१८) प्रयोग कालावधीत महापालिकेने प्राधिकृत केलेले अधिकारी अगर व्यवस्थापक तपासणी करु शकतील.

१९) कलामंदीराच्या प्रेक्षागृहाबाहेरील परिसरात मान्यताप्राप्त मक्तेदाराव्यतिरिक्त अन्य व्यक्तींना खादयपदार्थ / पेयांची विक्री करता येणार नाही.

२०) प्रयोग कालावधीत प्रेक्षागृहात थुंकणे/धुम्रपान करणे अथवा प्रेक्षागृहात खाद्यपदार्थ, शितपेयाच्या बाटल्या नेण्यास मज्जाव राहील. कॅन्टीन बाहेर कोणतेही खादयपदार्थ नेता येणार नाही. आक्षेपार्ह वर्तन करणाऱ्या प्रेक्षकास प्रेक्षागृहाबाहेर काढण्याचा अधिकार महापालिका प्रशासनास राहील.

२१) कलामंदीर/कलादालनाच्या भाडयामध्ये २५% सवलत देण्याचा ऐच्छिक अधिकार महापालिका आयुक्तांना राहील.

२२) काही अपरिहार्य कारणास्तव आरक्षीत तारीख/सत्र रद्द करणेचा, तसेच शासकीय अथवा मनपा कार्यक्रमासाठी खाजगी व्यक्ती/ संस्थेस दिलेले आरक्षण रद्द करणेचा अधिकार महापालिका प्रशासनास राहील.

२३) तांत्रिक बिघाडामूळे प्रयोग रद्द झाल्यास कार्यक्रमाचे भाडे पुढिल प्रयोगात समायोजित केले जाईल. तथापि, आयोजकाच्या चुकीमुळे प्रयोग रद्द झाल्यास भाडे रक्कम परत करण्यात येणार नाही अथवा समायोजित केले जाणार नाही

२४) प्रत्येक कार्यक्रमांकरीता व्दारपाल व्यवस्था आयोजकास करावी लागेल.

२५) कलामंदीर परिसरात कोणत्याही प्रकारे फलक/स्ट्रिकर्स/पताका/झेंडे लावू अथवा चिटकवू नये. कलामंदीर/ कलादालन येथील साहीत्य महापालिका प्रशासनाचे परवानगीशिवाय बाहेर नेता येणार नाही.

२६) कलामंदीर/कलादालन/ हॉल/ विश्रामगृह सशुल्क उपलब्ध करुन देणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार महापालिका आयुक्तांना आहेत. त्याचप्रमाणे ऑनलाईन अर्जामध्ये दिलेली माहिती खोटी असल्याचे सिध्द झाल्यास, आरक्षण रद्द करण्याचा अधिकार महापालिका प्रशासनास राहील.

२७) कलामंदीर/कलादालनाचा ताबा मनपा.कडे देतांना ते स्वच्छ व सुस्थितीत नसेल तर दंड रु.२०००/- आकारण्यात येईल.

२८) कलामंदीर व कलादालन मधील भिंतीवर ,फरशीवर लिहीणे, चिकटविणे अथवा कोणत्याही प्रकारे आर्थिक नुकसान करता येणार नाही. तसे केल्याचे आढळल्यास त्याची नुकसान भरपाई भरुन देणे आयोजकांवर बंधनकारक राहील.

२९) कलादालनातील प्रदर्शन व कार्यक्रमांसाठी कालावधी सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपावेतो राहील.

३०) या नियमाच्या अर्थाबाबत अगर वापराबाबत मतभेद झाल्यास, त्यासंबंधी महापालिका आयुक्तांचा निर्णय अंतिम राहील.

सदरच्या नियमात् भर टाकणे अगर बदलणे यासाठी कोणतीही पूर्वसूचना न देता, बदल करण्याचा अधिकार महापालिका आयुक्तांना आहे.

Sd/-
आयुक्त्
नाशिक महानगरपालिका,नाशिक

प्रति,

१.उपआयुक्त (मिळकत)
२.व्यवस्थापक,महाकवी कालीदास कलामंदीर/ महात्मा फुले कलादालन

प्रत - माहितीस्तव सादर,

मा.महापौर/मा.उपमहापौर/मा.सभापती,स्थायी समिती/ सर्व पदाधिकारी,
सर्व संबंधित/ मनपा संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी